**मौजे वडगाव, ता. हवेली, जि. पुणे येथे स्थापन करावयाच्या राज्यस्तरीय पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळेच्या प्रस्तावास जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत सुधारित प्रशासकीय मान्यता देणेबाबत ...**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः डब्ल्यूक्यूएम- २०१४/प्र. क्र.०७/पापु-१२**
**७ वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, मंत्रालय, मुंबई- ४०० ००१**
**तारीख : ११ जून, २०२४.**

वाचा

१) शासन निर्णय क्रमांक:- जजीमि-२०१९/प्र.क्र.१३८/पापु-१० (०७),दिनांक ०४ सप्टेंबर, २०२०.
२) अवर सचिव, पेयजल व स्वच्छता विभाग, जल शक्ती मंत्रालय, भारत सरकार यांचे आदेश क्र. W-११०२०/१९७/२०१५-WATER-I/१३, दिनांक १८ जुलै, २०२३ व आदेश क्र. W-११०२०/१९७/२०१५-WATER-I/३२, दिनांक ०६ सप्टेंबर, २०२३.
३) शासन निर्णय क्रमांकः- जजीमि-२०२३/प्र. क्र.३३१/पापु-१०, दिनांक ०१ ऑगस्ट, २०२३ व दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२३.
४) शासन निर्णय क्रमांक:- जस्वप्र-०४१७/प्र.क्र.१२१/पापु-११, दि.११ सप्टेंबर २०१९.
५) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांचे पत्र क्र.मु.अ.(पुणे)/तांशा-२/GSDA/प्रयोगशाळा/१७००/२०२२, दिनांक १४ जून २०२२.
६) आयुक्त, भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र जा.क्र. प्रयोग/भूसवियं/Sate lab २०२३/५२९/२०२३, दिनांक २० नोव्हेंबर, २०२३.

प्रस्तावना

राज्यामध्ये जल जीवन मिशन कार्यक्रम राबविण्याच्या अनुषंगाने संदर्भाधीन क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनामार्फत प्राप्त निधीपैकी २% निधी, पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षण घटकाखाली स्वतंत्रपणे तरतूद करणेबाबत, जल जीवन मिशन कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद करण्यात आले आहे. संदर्भाधीन क्रमांक २ व ३ येथील आदेशान्वये जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षण घटकाखालील केंद्र/राज्य हिस्सा निधी, राज्य पाणी व स्वच्छता मिशन,सिडको भवन, बेलापूर कार्यालयास वितरित करण्यात आला आहे.

जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत मौजे वडगाव, ता. हवेली, जि. पुणे येथील राज्यस्तरीय पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळा बांधकामाच्या एकूण रू. १०६७.४९ लक्ष रकमेच्या प्रस्तावास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव, आयुक्त, भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य पुणे यांनी संदर्भाधीन क्रमांक ६ येथील पत्रान्वये शासनास सादर केला आहे. यापूर्वी संदर्भाधीन क्र. ४ येथील शासन निर्णय दिनांक ११ सप्टेंबर २०१९ अन्वये, जलस्वराज्य-२ कार्यक्रमांतर्गत राज्यस्तरीय प्रयोगशाळा बांधकामाच्या रक्कम रू. ७७९.८२ लक्ष इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास तसेच सदरचे बांधकाम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून करून घेण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. तथापि, प्रयोगशाळा बांधकाम करावयाच्या संबंधित जमिनीची भारधारण क्षमता कमी असल्यामुळे पायाची खोदाई वाढविण्यात आली, RCC design करण्यात आले, संकल्पनचित्रात झालेले बदल व बांधकाम परवानासाठी पुणे महानगरपालिकेच्या नियमावलीमुळे झालेले बदल, काम जलद होण्याअनुषंगाने आर्किटेक्टची नेमणूक तसेच सुधारीत योजनेत १२% ऐवजी १८% GST घेण्यात आला या सर्व बाबींमुळे मूळ अंदाजपत्रकाच्या रू. ७७९.८२ लक्ष/- एवढ्या प्रशासकीय मान्यतेच्या किंमतीमध्ये वाढ होवून, सुधारित अंदाजित खर्च रु.१०६७.४९,३८२/- एवढा असून, झालेली वाढ ही ३६% आहे. सदर सुधारित रू.१०,६७,४९,३८२/- किंमतीच्या अंदाजपत्रकास मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांनी त्यांच्या उपरोक्त संदर्भाधीन क्र. ५ येथील दिनांक १४ जून २०२२ पत्रान्वये तांत्रिक मान्यता दिलेली आहे. यास्तव, आयुक्त, भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य पुणे यांनी मौजे वडगाव, ता. हवेली, जि. पुणे येथील राज्यस्तरीय प्रयोगशाळा बांधकामाच्या एकूण रु.१०,६७,४९,३८२/-रकमेच्या प्रस्तावास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याची विनंती केली आहे. त्यास अनुसरून, मौजे वडगाव, ता. हवेली, जि. पुणे येथील राज्यस्तरीय पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळा बांधकामाच्या एकूण रू. १०,६७,४९,३८२/-(रूपये दहा कोटी सदुसष्ट लक्ष एकोणपन्नास हजार तीनशे ब्याऐंशी फक्त) रकमेच्या प्रस्तावास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय

प्रस्तावनेत नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता, मौजे वडगाव, ता. हवेली, जि. पुणे येथील राज्यस्तरीय पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळा बांधकामासाठी आवश्यक रू.२.८७ कोटी रकमेच्या वाढीसह एकूण रू. १०, ६७, ४९,३८२/-(रूपये दहा कोटी सदुसष्ट लक्ष एकोणपन्नास हजार तीनशे ब्याऐंशी फक्त ) रकमेच्या प्रस्तावास, जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षण घटकाखालीलश् केंद्र/राज्य हिस्सा निधीमधून, आयुक्त, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा पुणे या कार्यालयामार्फत खर्च करण्याच्या प्रस्तावास, विहीत अटी व शर्तींची पुर्तता करण्याच्या अधीन राहून सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती:-**

अ) सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या किंमतीच्या मर्यादेतच सदरचे काम पूर्ण करण्यात यावे.

आ) सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव "व्यय अग्रक्रम समितीला" सादर करण्यापासून वगळण्याबाबतच्या वित्त विभागाच्या दिनांक २७ फेब्रुवारी २००४ च्या शासन निर्णयातील अट क्रमांक ४ विचारात घेता, विषयाधीन कामाचे कार्यारंभ आदेश देण्यापुर्वी, आयुक्त, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे यांनी विषयाधीन कामाच्या सुधारित प्रशासकीय मान्यता प्रकरणाचे मान्यताप्राप्त त्रयस्थ संस्थेच्या लेखापरिक्षकाकडून प्रथम लेखापरिक्षण करून घेण्यात यावे.

इ) विषयाधीन कामाकरिता संबंधित लेखाशिर्षांतर्गत चालू आर्थिक वर्षात वित्त विभागाकडून उपलब्ध होणाऱ्या तरतुदीच्या मर्यादेत खर्च करण्यात येईल, याची जबाबदारी आयुक्त, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांची राहील.

ई) या कामाकरिता आवश्यक तो निधी, अभियान संचालक (जजीमि), राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई यांच्याकडून आयुक्त, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे कार्यालयास उपलब्ध करून देण्यात येईल.

उ) बांधकामाच्या प्रगतीबाबतचा अहवाल नियमितपणे अभियान संचालक (जजीमि), राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई व शासनास सादर करण्यात यावा.

२. मौजे वडगाव, ता. हवेली, जि. पुणे येथील राज्यस्तरीय पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळा बांधकामाच्या मूळ प्रशासकीय व सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या अंदाजपत्राकाचा तुलनात्मक गोषवारा पुढीलप्रमाणे आहे :-

| **अ.क्र.** | **बाब** | **मूळ प्रशासकीय मान्यता (रु.)** | **सुधारित प्रशासकीय मान्यता (रू.)** |
|---|---|---|---|
| | २ | ३ | ४ |
| A) | CIVIL WORK OF MAIN BUILDING | ४,१३,९९,३८२.३२ | ४,४७,४९,८०२.९६ |
| | QUALITY CONTROL CHARGES | ३,५०,५१९.३० | ३,५०,५१९.३० |
| | TOTAL (१+२) | ४,१७,४९,९०१.६२ | ४,५१,००,३२२.२६ |
| | COMPOUND WALL | ४८,७१,२३०.२८ | ४०,६३,०९३.१७ |
| | HORTICULTURE WORK | ११,०५,४०४.८२ | ९,२२,०१८.१४ |
| | ROAD | ३६,९५,००२.९५ | ३२,१०,७४८.७०७ |

| | | | |
|---|---|---|---|
| | PARKING SHEDS | ८,००,०००.०० | ६,९०,४४४.६६ |
| | ELECTRICAL INCLUDING LIFTS | ८४,०७,५३६.४९ | ७०,७८,५७५.०८ |
| | PLUMBING AND SANITATION WORKS | २४,९८,२२७.६८ | २०,८४,०८२.७८ |
| | ५ KLD ETP | ४,३२,६००.०० | ३,५०,३२२ |
| | TOTAL OF Sr. No. ३ TO ९ | **६,३५,५९,९०३.८४** | **६,३४,९९,६०६.८२** |
| B) | EXTRA ITEMS FOR BUILDING COMPLETION | | |
| ० | ARCHITECT APPOINTMENT | ० | २१,००,००० |
| १ | PLUM CONCRETE | ० | ३९,६८,३५१.३१८ |
| २ | M१५ GRADE PCC | ० | १२,६८,३३८.३५ |
| ३ | FLY ASH BRICKWORK | ० | ४३,६०,९२३.७७ |
| ४ | FIREWORK (SPRINKLER AND HYDRANT SYSTEM) | ० | ७६,४६,८८३.२५ |
| | TOTAL OF Sr. No. १० TO १४ | ० | **१,९३,४४,४९६.७** |
| C) | TOTAL (A+ B) | **६,३५,५९,९०३.८४** | **८,२८,४४,१०३.५२** |
| D) | LABOUR INSURANCE ON (C) @०.५०% | ३,१७,७९९.५२ | ४,१४,२२०.५१ |
| E) | TOTAL OF C + D | **६,३८,७७,७०३.३६** | **८,३२,५८,३२४** |
| F) | GST ON (E) @१२.००% | ७६,६५,३२४.४० | १,४६,७६,८८९.६४ |
| G) | NET COST(TOTAL E + F ) | **७,१५,४३,०२७.७७** | **९,७९,३५,२१३.६८** |
| H) | E.T.P. CHARGES ON (G) @ | ६४,३८,८७२.५० | ८८,१४,१६९.२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | ९.००% | | |
| | GROSS COST / TOTAL COST OF WORK (G + H) | ७,७९,८१,९००.५२ SAY Rs. ७,७९,८२,०००.०० | १०,६७,४९,३८२.९ SAY Rs. १०,६७,४९,०००.०० |

३. या बांधकामासाठी होणारा खर्च मागणी क्र. वाय-०२, लेखाशिर्ष २२१५ पाणी पुरवठा व स्वच्छता, ०१ पाणी पुरवठा, १०२, ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम, (०२) जिल्हा परिषदांना योजनांतर्गत अनुदाने, (०२) (३०) जल जीवन अभियान पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षणासाठी अर्थसहाय्य ( केंद्र हिस्सा ६०%) कार्यक्रम (२२१५ ९९८९) व (राज्य हिस्सा ४०%) कार्यक्रम (२२१५ ९९७१) या लेखाशिर्षाखालील ३१, सहायक अनुदाने (वेतनेत्तर) सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरिता मंजुर अनुदानातून भागविण्यात यावा व त्याखाली अंतिमत: खर्ची टाकण्यात यावा.

४. सदर शासननिर्णय नियोजन विभाग व वित्त विभाग यांच्या सहमतीने अनुक्रमे नियोजन विभागाचा अनौपचारिक संदर्भ ७४९/का.१४४३, दिनांक ०६/०२/२०२४ व वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ १४०५/व्यय-३, दिनांक २०/०२/२०२४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०६१११११३३००७०२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

CHANDRAKANT KRISHNA MORE

Digitally signed by CHANDRAKANT KRISHNA MORE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WATER SUPPLY AND SANITATION DEPARTMENT, 2.5.4.20=11ac200219edb36f7777ee1101657bea4271090267228122b638d6f2cdedad62, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2314CF333E070F9936792BC95890FA89B2F617A931B2B577B703FA858F3DF433, cn=CHANDRAKANT KRISHNA MORE
Date: 2024.06.11 15:30:22 +05'30'

**( चं. कृ. मोरे. )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

मा.अध्यक्ष, विधानसभा/मा.सभापती विधान परिषद/मा.विरोधी पक्षनेता विधानसभा /विधानपरिषद.

१) मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) मंत्रालय, मुंबई, यांचे खाजगी सचिव.

२) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

३) महालेखापाल,महाराष्ट्र-१,मुंबई (लेखापरिक्षा व अनुज्ञेयता).

४) महालेखापाल,महाराष्ट्र-२,नागपूर (लेखापरिक्षा व अनुज्ञेयता).

५) प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई,

६) अभियान संचालक (जजीमि),राज्य पाणी व स्वच्छता मिशन,सिडको भवन,बेलापूर.

७) आयुक्त, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.

८) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

९) मुख्य अभियंता, प्रादेशिक विभाग, महारष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे.

१०) सह सचिव/उप सचिव (सर्व)/मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई, यांचे स्वीय सहायक.

११) कार्यासन पापु-०४/पापु १०, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई-०१

१२) निवडनस्ती पापु-१२, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय,मुंबई-०१